# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director Students' Welfare (I/c.)**
**Ph. No. - 07132-223320**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** nssdsw.gug@ gmail.com

पत्र क्र. **No.GU/DSW / 466 /2025** **Dt: 22.07.2025**

**प्रति,**

**मा. प्राचार्य**
**संलग्नित सर्व महाविद्याल/ विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेकरिता प्रस्ताव मागविण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आणास कळविण्यात येते की, आपल्या देशात भूकंप, दुष्काळ, अपर्पप, दंगल, चक्रीवादळ, औद्योगीक अपघात,सुनामी, आग या आपत्तीची वांरवता दिवसे दिवस वाढली आहे. यासाठी जनजागृती करण्याचे काम आश्यक आहे. या हेतूने सत्र २०१४-१५ पासून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने संलग्नित करण्यात आलेल्या विहित नियमावली व प्रस्ताव प्रारूपा नुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या मा. प्राचार्याकडून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचे स्विकृती पत्र व अर्ज दिनंका १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालय येथे सादर करावे हि विनंती

**धन्यवाद!**

Gondwana University, Gadchiroli
Seal

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
# विद्यार्थी विकास विभाग
# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**प्रस्तावना :**

आपत्तीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन महत्वाचे आहे. आपल्या देशात भूकंप, दुष्काळ, अवर्षण, दंगल, चक्रीवादळे, औद्योगिक अपघात, त्सुनामी लाटा, आग इत्यादी आपत्तींची वारंवारिता वाढली आहे. यासाठी जनजागृती करण्याचे काम आवश्यक आहे. हा विचार करुन गोंडवाना विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली आहे.

**उद्दिष्टे :**

- विद्यार्थ्यांना विविध आपत्तींचे आकलन करून देणे.
- विद्यार्थ्यांना आपत्ती टाळण्यासाठी माहितीचे विविध स्त्रोत विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.
- अटळ आपत्तींना सामोरे जाण्याची तयारी करणे.
- आपत्तीनंतर बचाव कार्य व मदत कार्य वेगाने व सूत्रबध्दतेने करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये
- निर्माण करणे याकरिता तज्ज्ञांकरवी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे
- आपत्ती व्यवस्थापनांतून सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निमार्ण करणे.
- आपत्ती येण्यापूर्वी त्या येऊ नयेत म्हणून पूर्वतयारीबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे.
- महाविद्यालयीन स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष करणे.
- आपत्ती व्यवस्थापन कायद्यांची व नियमांची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करून देणे.
- आपत्तींच्या प्रसंगी विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून स्वयंस्फूर्तीने सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे
- आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनास योग्य ते सहकार्य करणे.

**योजनेसाठी पात्रता :**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण ही योजना गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांमधून उच्चशिक्षण घेणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांसाठी आहे.

**योजनेसाठी अनुदान :**

सदर योजनेअंतर्गत किमान ०२ महाविद्यालयांचा गट करून एकत्रित ५० विद्यार्थ्यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करावयाचे असल्याने ज्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात येईल, त्या आयोजक महाविद्यालयाला विद्यापीठाकडून रु. १५,०००/- अर्थसहाय्य देण्यात येईल

**सदर अनुदानातून खालीलप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येईल :**

| | |
|---|---|
| आयोजन खर्च ( चहा, नाष्टा, भोजन, साधनसामग्री इ.) | **रू. १०,०००/-** |
| तज्ज्ञ व्यक्तींचे मानधन | **रू. ३,०००/-** |
| आकस्मिक व इतर खर्च यंत्रे / साहित्य व वाहतूक | **रू. २,०००/-** |
| एकूण | **रू. १५,०००/-** |

**प्रस्ताव दाखल करण्याची पध्दत :**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी किमान ०२ महाविद्यालयांचा गट इच्छुक आयोजक महाविद्यालय तयार करेल किंवा संचालक विद्यार्थी कल्याण एका आयोजक महाविद्यालयाची निवड करतील. निवड झालेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याने कृतिसत्रासाठी प्रस्ताव दाखल करावयाचा आहे. याकरिता आवश्यक असलेला विहित नमुन्यातील अर्ज सोबत जोडला आहे. तो पूर्णपणे भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे ३० सप्टेंबर पूर्वी पाठवावा . निर्धारित तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचा मान्यतेसाठी विचार केला जाणार नाही.

**योजनेची अमलबजावणी**

सदर योजना विद्यार्थी कल्याण विभागाने ठरवून दिलेल्या किमान ०२ महाविद्यालयांच्या समूहाने एकत्रितरित्या राबवायची आहे. याकरिता संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याने संचालक विद्यार्थी कल्याण यांचेशी विचारविनिमय करून कार्यक्रमाचे नियोजन करावे. गटातील प्रत्येक महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थी- विद्यार्थीनींची या कृतिसत्रासाठी निवड करताना प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांनाच प्राधान्य द्यावे. प्रत्येक महाविद्यालयाच्या २५ याप्रमाणे ५० विद्यार्थी विद्यार्थीनीचे दोन दिवसीय प्रशिक्षण कृतिसत्र गटातील विद्यार्थ्यांनी निश्चित केलेल्या महाविद्यालयात आयोजित करावे.

कृतिसत्रात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च त्यांच्याच महाविद्यालयाने करावयाचा आहे. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात यावे. व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या स्थानिक पातळीवरील तज्ज्ञांना प्राधान्य देण्यात यावे. जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन घ्यावे. प्रशिक्षण कार्यक्रम संपूर्ण दोन दिवसांचा स. १० ते सांय ५ या वेळेत घेण्यात यावा.

सदर उपक्रम राबविताना विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालकांशी संपर्क करून एक सदस्यांना निमंत्रित करणे अनिवार्य राहील.

**प्रशिक्षण कार्यक्रमातील विषयः**

- ✓ आपत्ती व आपत्कालीन व्यवस्थापन
- ✓ भूकंप व त्सुनामी.
- ✓ वीज आणि वादळे.
- ✓ पुर आणि आग.
- ✓ औद्योगिक व रासायनिक दुर्घटना.
- ✓ दुष्काळ.

- ✓ प्रथमोपचार.
- ✓ आपत्ती प्रश्चात तणाव व्यवस्थापन आणि वर्तमानकालीन आपत्ती विषयक.

वरीलपैकी किमान चार विषयांच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव कृतिसत्रात असावा. प्रशिक्षण

तज्ज्ञांमार्फत देण्यात यावे व प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. प्रशिक्षण कार्यक्रम संपल्यानंतर त्याचा विस्तृत अहवाल फोटोसह तयार करावा. कृतिसूत्रात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयनिहाय हजेरी पत्रक ठेवण्यात यावे.

**अहवाल व हिशेब सादर करण्याची पध्दत :**

- ❖ कृतिसत्रात सहभाग घेतलेल्या महाविद्यालयांची यादी सादर करावी.
- ❖ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कृतिसत्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळ हजेरी - पत्रक ( झेरॉक्स नको) सादर करावे.
- ❖ हिशेब कोणत्याही परिस्थितीत त्या त्या वर्षाच्या १० मार्चपर्यंत पाठवावेत.

**हिशेब सादर करताना पुढील कागदपत्रांची पूर्तता करावी:**

- आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचे मान्यतापत्र.
- आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेकडे तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मागणीकरिता केलेल्या कार्यवाहीचे पत्र जोडणे आवश्यक आहे.
- आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचा अहवाल ( फोटो व वृत्तपत्र कात्रणासह )
- आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेसाठी झालेल्या खर्चाच्या मूळ पावत्या ( झेरॉक्स नको)
- हिशेब सादर करताना विवरणपत्रावर प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे
- दोन दिवसांच्या कृतिसत्राची तपशीलवार कार्यक्रमपत्रिका.

नियमावलीत योग्य ते बदल करण्याचे अधिकार मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे असतील.

(डॉ. प्रिया गेडाम )
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(डॉ. प्रशान्त बोकारे)
मा. कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
## विद्यार्थी विकास विभाग,
## महाविद्यालयीन स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, २०   —२०   साठी प्रस्ताव

१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ...............................................................................

२) महाविद्यालय स्थापनेचे वर्ष : ...............................................................................

३) प्राचार्यांचे नांव : ...............................................................................

४) विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नांव व मोबाईल क्र. : ......................................................

५) महाविद्यालयातील एकूण प्राध्यापकांची संख्या : ..............................................................

६) महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या : मुले....................मुली................एकूण....................

७) महाविद्यालयातील एकूण शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या : ................................................

८) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेअंतर्गत गटातील अन्य महाविद्यालयांची माहिती:....................

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव व पत्ता | विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नांव |
|---|---|---|
| १. | ........................................ | ........................................ |
| २. | ........................................ | ........................................ |
| ३. | ........................................ | ........................................ |
| ४. | ........................................ | ........................................ |
| ५. | ........................................ | ........................................ |

९. सन २०—२०या शैक्षणिक वर्षात सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा संभाव्य खर्चाचा आढावा.

१)

२)

१०. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून द्यावयाच्या प्रशिक्षणासाठी स्थानिक प्रशिक्षक उपलब्ध आहेत काय?   होय/नाही

११. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कृतिसत्रासाठी महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सुविधा:

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

| विद्यार्थी विकास अधिकारी<br>स्वाक्षरी व शिक्का | महाविद्यालयाची<br>शिक्का | प्राचार्य<br>स्वाक्षरी व शिक्का |
|---|---|---|